**निशाणी ५१, ५२, ६२ चे अर्जावरील एकत्रीत आदेश**

प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी ऋणको क्र. १ तुकाराम बाळा कोळी व ऋणको क्र. १३ लक्ष्मण बाळा कोळी यांचे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर न घेतलेने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता, वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करणेबाबत व ऋणको क्र. १ व १३ यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती नियमीत दरखास्तमध्ये करण्यास परनवागी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. धनको यांचे अर्जातील कथनानुसार, ऋणको क्र. १ व १३ हे वृध्दपकाळाने मयत झालेले आहेत. सदर ऋणको क्र. १ व १३ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक आहेत. करिता, अबेटमेंट रद्द होवून, वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून ऋणको क्र. १ व १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची व तशी दुरूस्ती नियमीत दरखास्तमध्ये करण्याबाबत परवानगी मिळण्याची धनको यांनी विनंती केली आहे.

०३. ऋणको यांनी उपरोक्त अर्जावर त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले की, ऋणको क्र. १ हे तीन वर्षापूर्वी व ऋणको क्र. १३ हे चार वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. धनको यांनी खरी माहिती मा. न्यायालयापासुन लपवून ठेवलेली आहे. तसेच धनको यांनी ब–याच दिवसानंतर अर्ज दाखल केले. त्यामुळे उपरोक्त अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचे अर्ज व म्हणणे वाचले. धनको व ऋणको यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दरखास्तच्या स्वरुपाचा विचार करता दरखास्तमध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ४ विचार करता जर ऋणको याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार धनकोला टिकून राहिला तर ऋणकोच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दरखास्तचे स्वरुप पाहता दरखास्तमध्ये ऋणको यांचे वारसांविरुध्द दरखास्त करण्याचा अधिकार धनकोला आहे असे दिसून येत आहे. सबब, झालेला अबेटमेंटचा

आदेश रद्द करणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झालेचे दिसून येत आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

०२. धनको यांचे विरुध्द ऋणको क्र. १ च १३ यांचा अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

०३. वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

०४. वादी यांनी ऋणको क्र. १ च १३ यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी, तसेच दुरूस्त दरखास्तची प्रत व आवश्यक प्रती तदनंतर तात्काळ सादर कराव्यात.

०५. धनको यांनी सदर अर्जांच्या खर्चाची रक्कम रूपये ४००/– ऋणको यांना द्यावी.

स्वाक्षरित/–
(आर. व्ही. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन

दिनांकः ३१.०८.२०२३.
भोकरदन.

### <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः युु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ३१.०८.२०२३.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही